# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः28.12.2024** **वारःशनिवार**

---

**ठळक बातम्या,**

१. माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या पार्थिव देहावर आज नवी दिल्लीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार

२. डॉक्टर मनमोहन सिंग यांना राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान यांच्यासह जगभरातील नेत्यांकडून श्रद्धांजली

३. राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यात विविध जनजागृती उपक्रम

आणि

४. महिलांच्या क्रिकेटमध्ये पन्नास षटकांच्या मालिकेत भारताचा वेस्ट इंडिजवर संपूर्ण विजय

**पंतप्रधान मनमोहनसिंग**

माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या पार्थिव देहावर आज नवी दिल्लीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. तत्पुर्वी कॉंग्रेस भवनात त्यांचा पार्थिव देह अंत्यदर्शनासाठी ठेवला जाणार आहे. अंत्यसंस्कार विधीचं थेट समालोचन आकाशवाणीवरुन आज सकाळी अकरा वाजेपासून करण्यात येणार आहे. एफएम रेनबो, इंद्रप्रस्थ, राजधानी आणि सर्व स्थानिक केंद्रांवरुन ते सहक्षेपित करण्यात येईल.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल डॉक्टर सिंग यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचं अंत्यदर्शन घेतलं. शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रात सहजतेनं काम केलेल्या विरळा व्यक्तिमत्वांपैकी डॉक्टर सिंग एक होते असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. तर उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देशाच्या विकास आणि समृद्धीचे नवे मार्ग खुले करणारे अर्थमंत्री म्हणून डॉक्टर मनमोहन सिंग ओळखले जातात असं सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, डॉ. मनमोहन सिंग हे प्रामाणिक व्यक्ती, महान अर्थशास्त्रज्ञ आणि आर्थिक सुधारणा घडवणारे नेते म्हणून स्मरणात राहातील असं आपल्या शोकसंदेशात सांगितलं.

अफाट बुद्धिमत्ता आणि प्रामाणिकपणे देशाचं नेतृत्व करणारे डॉ. सिंग गुरू आणि मार्गदर्शक होते, ते लाखो लोकांच्या स्मरणात राहातील अशा शब्दांत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. तर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दूरदर्शी, निष्कलंक आणि प्रामाणिक नेता आणि अतुलनीय अर्थतज्ज्ञ गमावल्याची खंत व्यक्त केली.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उत्तम प्रशासक अशा शब्दांत डॉक्टर मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहिली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही डॉ. सिंग यांना श्रद्धांजली वाहिली आहे. जगभरातल्या विविध राष्ट्राच्या प्रमुखांनीही सिंग यांना श्रद्धांजली अर्पण करणारे शोकसंदेश पाठवले आहेत.
राष्ट्रीय स्वयंसेवक संघानंही डॉक्टर सिंग यांना श्रद्धांजली अर्पण करुन शोक व्यक्त केला आहे.

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करणारा ठराव संमत करण्यात आला. डॉक्टर सिंग यांच्या निधनाचा शोक म्हणून देशभरात सात दिवसांचा दुखवटा घोषित करण्यात आला आहे. काँग्रेस कार्यकारी समितीनं देखील डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव संमत केला. डॉक्टर सिंग यांच्या जीवनकार्यामुळं देशाच्या भविष्याला भरीव आकार दिल्याचं या ठरावात म्हटलं आहे.

माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या जीवनकार्याचा हा आलेख...
**भारताचे चौदावे पंतप्रधान असलेल्या डॉक्टर मनमोहन सिंग यांची ओळख देशाच्या आर्थिक सुधारणांचा पाया रचणारे पंतप्रधान तसंच अभ्यासू, विचारवंत आणि अर्थशास्त्रज्ञ म्हणूनही होती.प्राध्यापक, अर्थतज्ज्ञ, नियोजन आयोगाचे सदस्य, आर्थिक सल्लागार, रिझर्व बँकेचे गर्वनर अशी शैक्षणिक, प्रशासकीय कारकीर्द असलेल्या डॉक्टर मनमोहन सिंग यांनी 1991 साली भारताच्या अर्थमंत्रीपदाची धुरा खांद्यावर घेतली. या दशकात भारताच्या आर्थिक उदारीकरण आणि एकूणच सुधारणांचे शिल्पकार म्हणून त्यांची ओळख भारतीय जनतेला आहे. त्यांच्या कारकीर्दीत कर कमी केले तसंच सार्वजनिक क्षेत्रातल्या आस्थापनांचं खासगीकरण करत परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन दिलं. त्यानंतर युपीए सरकारच्या 2004 ते 2014 या कार्यकाळात सलग दहा वर्ष पंतप्रधानपदाची जबाबदारी पेलली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात अमेरिकेबरोबर ऐतिहासिक अणुउर्जा करार करण्यात आला. त्यामुळे भारताला आण्विक तंत्रज्ञानाची दारं खुली झाली. आर्थिक धोरणांमध्ये बदल केल्यानं देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळाली. प्रामाणिक आणि सचोटीनं काम करणारे नेते म्हणून ख्याती असलेल्या, मनमोहनसिंग यांची पंतप्रधानपदाची दुसऱ्या टप्प्यातली कारकीर्द विविध कारणांनी गाजली. सलग 33 वर्ष राजकारणात राहिल्यानंतर**

**ते या वर्षाच्या एप्रिल महिन्यात राज्यसभेतून निवृत्त झाले होते. त्यांनी भारताच्या आर्थिक धोरणांवर मजबूत ठसा उमटवला होता. पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात सामान्य लोकांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठीही त्यांनी व्यापक प्रयत्न केले होते. डॉक्टर मनमोहनसिंह यांची कारकीर्द म्हणजे संघर्षपूर्ण परिस्थितीतूनही यशोशिखरं कशी गाठावी याचे भावी पिढीसमोर उत्तम उदाहरण आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी विजयालक्ष्मी साळवी पुणे.**

**क्षयरोगराज्य**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत राज्यात विविध जनजागृती उपक्रम राबवले जात आहेत. यासाठी 100 दिवसांची मोहीम आखण्यात आली आहे. त्याअंतर्गत जनसहभाग, अतिजोखमीच्या रुग्णांची तपासणी, योग्य आहार या गोष्टींवर भर दिला जात असून, क्षयरुग्णांना 160 नि-क्षय मित्रांच्या माध्यमातून पोषक आहार देण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातही क्षयरोगाचे सक्रीय रुग्ण असलेल्या भागात सर्वेक्षणासाठी 262 पथकांची नेमणूक करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी डॉक्टर सचिन देसाई यांनी दिली. कोल्हापूर जिल्ह्यात तुरुंगातील कैदी, निवासी शाळा, औद्योगिक वसाहती आणि कारखाने, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, BMI 18 पेक्षा कमी असणा-या व्यक्ती, झोपडपट्ट्या, औद्यगिक वसाहतीमधील कामगार, स्थलांतरीत ऊसतोडणी कामगार यांची तपासणी केली जात आहे.

**नाणीप्रदर्शन**

इंटरनॅशनल कलेक्टर्स सोसायटी ऑफ रेअर आयटम्स् यांच्यातर्फे पुण्यात कॉईनेक्स पुणे 2024 या राष्ट्रीय प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. मुघल काळातील सुवर्ण नाण्यांचे संग्राहक आणि लेखक तरूण फेरीवाल यांच्या हस्ते काल या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. उद्या रविवारपर्यंत सकाळी 10 ते संयाकाळी 7 या वेळेत विनामूल्य खुलं असणाऱ्या या प्रदर्शनाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून,..

**भारतात सुमारे तीन ते चार हजार वर्षांपूर्वीपासून नाणी प्रचलित आहेत. अशी सुमारे तीन हजार वर्षांपूर्वी पासूनची विविध धातूंपासून तयार केलेली प्राचीन, मुघल, नजराणा,मराठा,एरर अशा दुर्मिळ आणि प्राचीन नाण्यांची वैविध्यता पुणेकरांना बघायला मिळणार आहे. तसंच चलनी नोटा आणि काही फॅन्सी चलनंही बघता येणार आहेत. प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांना ही दुर्मिळ नाणी खरेदी करण्याची तसंच विकण्याचीही संधी उपलब्ध असेल. इच्छुकांना नाण्यांची किंमत, त्यांचा काळ, त्यावरील लिपी, इतिहास आणि वैशिष्ट्यं यांची माहिती नाणेशास्त्रातल्या तज्ज्ञांकडून जाणून घेता येईल. प्रदर्शनानिमित्त विविध तज्ज्ञांच्या व्याख्यानांचंही आयोजन करण्यात आलं आहे. आज ‘रायगड शिलालेखाचे वाचन’, ‘सिंधुदूर्ग जिल्ह्यातील रामगढ गावातील विजयनगर काळातील शिलालेख’ ‘नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यात आढळून आलेल्या अज्ञात**

**राजाच्या तांब्याच्या प्लेटस्' आणि 'कोकण प्रदेशात अलीकडेच सापडलेली मध्ययुगीन काळातील नाणी' या विषयांवर होणारी ही व्याख्यानं इतिहास, मंदिर आणि मूर्तीशास्त्र तसंच सामाजिक शास्त्रातील संशोधक विद्यार्थ्यांसाठी पर्वणी ठरतील. आकाशवाणी बातम्यांसाठी नितीन जळूकर यांच्यासह सुरेखा जोशी पुणे**

**महिला क्रिकेट**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्या महिला क्रिकेट संघांमध्ये काल वडोदरा इथं झालेल्या सामन्यात भारतीय संघानं वेस्ट इंडिजवर 5 गडी राखून विजय मिळवला. मर्यादित 50 षटकांच्या तीन सामन्यांची ही मालिका भारतानं 3-0 अशी जिंकली. कालच्या सामन्यात दीप्ती शर्मानं 31 धावात 6 फलंदाजांना बाद करत वेस्ट इंडिजचा डाव 162 धावांवर रोखला. यजमान भारतीय महिला संघानं 163 धावांचं हे आव्हान 29 व्या षटकातच पार केलं.

**नंदुरबार पाऊस**

नंदुरबार जिल्ह्यात काल अनेक ठिकाणी पावसानं हजेरी लावली. काही भागात तुरळक सरी कोसळल्या तर धडगाव तालुक्यातल्या काकर्दे इथं अर्धा तास मुसळधार पाऊस झाला. या पावसाचा फटका जिल्ह्यातल्या पिकांना, तसंच आंबा उत्पादनावर होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**जळगाव पाऊस**

जळगाव जिल्ह्यातील रावेर, भुसावळ, यावल आणि जळगाव तालुक्यातील काही भागांमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह आलेल्या जोरदार पावसानं हरभरा, तूर आणि फरदड कापसाचं नुकसान झालं. कोरडवाहू पिकांना मात्र याचा लाभ होणार आहे.

**हवामान**

येत्या 24 तासांत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता आहे. कोकणात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**